## MAHARASHTRA ACT No. XVII OF 1980

## THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) (EXTENSION OF DURATION) ACT, 1980

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १२ ऑगस्ट १९८० रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
सचिव,
महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XVII OF 1980

## AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) ACT, 1971

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १२ ऑगस्ट १९८० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

### सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत वाढवण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत वाढविण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झाली होती आणि त्या प्रयोजनासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (मुदत वाढवणे) अध्यादेश, १९८० हा दिनांक २८ जून १९८० रोजी प्रख्यापित केला ; (१९७१ चा महा. ४७.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :— (१९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ६.)

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (मुदत वाढवणे) अधिनियम, १९८० असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, २८ जून १९८० रोजी अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम, ४७ याच्या कलम १ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" म्हणून करण्यात आला आहे) याच्या कलम १ च्या पोट-कलम (४) मधील "१९८०" ह्या आकड्याऐवजी "१९८१" हा आकडा दाखल करण्यात येईल. १९७१ चा महा. ४७.

१९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ६ चे निरसन व व्यावृत्ती.

३. (१) महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (मुदत वाढवणे) अध्यादेश, १९८० याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८० चा महा. अध्या- देश क्र. ६.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणेच्या मुख्य अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कारवाई ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणेच्या उक्त अधिनियमान्वये केलेली गोष्ट किंवा यथास्थिती, कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद),

य. शं. कानिटकर,
भाषा संचालक व शासनाचे पदसिद्ध उप सचिव,
सामान्य प्रशासन विभाग.